# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१९

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### राज्यातील शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यांबाबत

**(१) १०१९१ (०९-०५-२०१५) श्री.शंभूराज देसाई (पाटण), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील डोंगरी व दुर्गम भागातील २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करण्यात येवू नयेत त्याचबरोबर जिल्हा बाहृयबदलीच्या जाचक अटी शिथील करुन रिक्त जागी विनाअट जिल्हृयातील शिक्षकांच्या बदल्या करण्यात याव्यात इत्यादी २० विविध मागण्या प्राथमिक शिक्षकांनी शासनाकडे केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रलंबीत मागण्यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने उक्त मागण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-०१-२०१९) :** (१) याबाबतचे निवेदन शासनास प्राप्त नाही
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबईसह राज्यात प्लास्टीकच्या अंड्यांची व धान्याची विक्री होत असल्याबाबत

**(२) ८५०१४ (२१-०८-२०१७) श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भांडूप (मुंबई) येथील गणेशनगर भागात राहणारे श्री.राजेश सावंत, व विरारमध्ये राहणारे श्री.मंदार मिंगळे यांना कोथरुड परिसरात प्लास्टीकच्या अंड्याची विक्री होत असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची तक्रार अन्न व औषध प्रशासनाकडे कोथरुड भागातील एका महिलेने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच मुंबईत देखील प्लॉस्टिक तादुळांची भेसळयुक्त विक्री केली जात असून मुंबई व लगतच्या शहरांमध्ये रसायनांव्दारे आंबा, द्राक्ष, केळी व इतर फळे पिकविण्यात येत असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्न भाग (२) मधील तक्रारीच्या अनुषंगाने अन्न व औषध प्रशासनाने तक्रारदार महिलेने खरेदी केलेल्या संबंधित दुकानातील अंड्याचे नमूने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविले असून उक्त तपासणी अहवाल प्रयोगशाळेकडून प्राप्त झाला आहे काय,

(५) असल्यास, राज्यात प्लास्टिक अंडी विक्री व रसायनाच्या माध्यमातून आंबा, द्राक्ष, केळी व इतर फळे पिकविण्यात येणाऱ्या घटनांची शासनाने दखल घेतली असून असे प्रकार करणाऱ्यां विरोधात कडक कारवाई करण्याचा इशारा मा.अन्न व औषध मंत्री यांनी माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त प्रकाराला प्रतिबंध करण्याकरिता कार्यवाही करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२८-११-२०१८) :** (१) श्री. राजेश सावंत व मंदार मिंगळे यांच्याकडून अन्न व औषध प्रशानास तक्रार प्राप्त झाली नाही. कोथरुड, पुणे येथे प्लॅस्टिकची अंडी विक्री होत असल्याची तक्रार अन्न औषध प्रशासनास दि.०३ एप्रिल, २०१७ रोजी प्राप्त झाली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही, अशी बाब अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आलेली नाही.

(४) सदर प्रकरणी अंड्याचे पुरवठादार मे.राहुल चिकन अॅण्ड एग्ज, कर्वेनगर, पुणे यांच्याकडून अंड्याचा नमुना विश्लेषणासाठी घेण्यात आला होता. सदर नमुन्याचा अहवाल प्राप्त झाला असून नमुना प्रमाणित आहे.

(५) होय, हे खरे आहे.

(६) बृहन्मुंबई विभागात आतापर्यंत आब्यांचे ०७ व इतर फळे ०५ असे एकूण १२ नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले होते. सदर नमुन्यांचे अहवाल प्राप्त झाले असून ते प्रमाणित घोषित झाले आहेत. मुंबई लगतच्या कोकण विभागात आंब्याचे ०८ नमुने विश्लेषणासाठी घेवून रु.८३,८००/- किमंती साठा जप्त करण्यात आला आहे. तसचे इतर फळाचा ०१ नमुना विश्लेषणासाठी घेण्यात आला होता. सदर नमुन्यांचे अहवाल प्रलंबित आहेत.

संपूर्ण राज्यात अंड्याचे ३३ नमुने घेण्यात आले असून २९ नमुने प्रमाणित घोषित झाले आहेत. तर चार नमुन्यांचे अहवाल प्रलंबित आहेत

बृहन्मुंबई विभागात तांदळाचे दोन नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले असून सदर नमुने प्रमाणित घोषित झाले आहेत.

---

**विज्ञान व तंत्रज्ञान विभाग भारत सरकार यांचेकडून राज्यातील ६ विद्यार्थ्यांची जपान भेटीकरीता निवड करण्यात आल्याबाबत**

**(३) ८७३५१ (१८-०८-२०१७) श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विज्ञान व तंत्रज्ञान विभाग भारत सरकार यांचेकडून राज्यातील ६ विद्यार्थ्यांची जपान देशाच्या भेटीकरीता निवड करण्यात आल्याचे दि.१७/०४/२०१७ च्या पत्रानुसार संचालक प्रादेशिक विद्या प्राधिकरण, रविनगर, नागपूर यांच्याकडून कळविण्यात आले आहे, खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाकडून मात्र अशा विद्यार्थ्यांसाठी परदेश भेटीकरीता कोणत्याही निधीची तरतूद करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा निवड झालेल्या विद्यार्थ्यांना शासन विशेष बाब म्हणून परदेश भेटीकरीता निधीची उपलब्धता करेल काय,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१९-०१-२०१९) :** (१) होय.

(२) होय.

(३) सदर विद्यार्थ्यांचा संपूर्ण खर्च भारत सरकार व जपान सरकार करत असल्याने राज्यशासनाने निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बृहन्मुंबई महानगर पालिका क्षेत्रातील २४ प्रभागांतील औषध दुकानातील शेड्युल एच-१ मधील एमटीपी औषध खरेदी-विक्रीवर बंदी घालण्याची मागणी**

**(४) ८८३१८ (२१-०८-२०१७) श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगर पालिका क्षेत्रातील २४ प्रभागातील औषध दुकानातील शेड्युल एच-१ मधील एमटीपी औषध विक्रीवर बंदी घालण्याची मागणी सदर परिक्षेत्रातील स्थानीक जनप्रतिनिधी, नागरिक व भोगवटदारांनी मा.मुख्यमंत्री, मा.वैद्यकीय शिक्षणमंत्री, मा.सार्वजनिक आरोग्य व कुटूंब तसेच मा.राज्यमंत्री, मा.नगरविकास, राज्यमंत्री, मुख्य सचिव, अतिरिक्त मुख्य सचिव, नगरविकास, वैद्यकीय शिक्षण/सार्वजनिक आरोग्य व कुटूंबकल्याण विभाग तसेच सचिव अन्न व औषधी द्रव्ये प्रशासन विभाग, .महापालिका आयुक्त व आयुक्त, मुंबई तसेच महानगर क्षेत्रविकास प्राधिकरण, महामुंबई आणि त्यांच्या अधिनस्त सार्वजनिक आरोग्य सेवांचे प्राधिकारी यांचेकडे दिनांक २७ एप्रिल, २०१७ रोजी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२८-११-२०१८) :** (१) बृहन्मुंबई म.न.पा. क्षेत्रातील विना वैध प्रिक्रिप्शन शेड्युल एच १ मधील बेकायदा औषध विक्रीवर कायदेशीर कारवाई करण्याबाबत अखिल भारतीय भ्रष्टाचार विरोधी सामाजिक न्याय मंच यांनी दि.२०/०२/२०१६ व दि.१८/०४/२०१६ रोजीच्या पत्रान्वये मा.प्रधानमंत्री, भारत सरकार यांना पाठविलेल्या निवेदनाच्या प्रती मा.मुख्यमंत्री सचिवालयामार्फत अन्न व औषध प्रशासनास प्राप्त झाल्या आहेत.
(२) अन्न व औषध प्रशासनाने सदर निवेदनात नमूद बृहन्मुंबई कार्यक्षेत्रातील औषध विक्रेत्यांची तपासणी केली असून औषधे व सौंदर्य प्रसाधने कायद्यातील तरतूदींच्या उल्लंघनासंदर्भात संबधित औषध विक्रेत्यांविरुध्द परवाने रद्द वा निलंबन करण्याची कारवाई केली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे गोलाग्री (ता.जि.बीड) येथील सफरचंद व चिकू खाल्याने दोन बालकांचा झालेला मृत्यु**

**(५) ९०७५७ (२१-०८-२०१७). श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे गोलाग्री (ता.जि.बीड) येथील सफरचंद व चिकू खाल्याने दोन बालकांचा मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२८-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) तथापि, बीड तालुक्यातील मौजे गोलाग्री येथील सफरचंद व चिकु खाल्याने दोन बालकांचा मृत्यु झाल्याबाबतची बातमी प्रसिध्द झाली होती. सदर बातमीच्या अनुषंगाने तपास केला असून बाधित रुग्णांनी फक्त चिकू व सफरचंद न खाता चपाती व भाजी यांचे सेवन केले होते. या प्रकरणी फळ विक्रेत्याकडून चिकू व सफरचंदाचे नमुने घेण्यात आले होते. सदर नमुने प्रमाणित आहेत. तसेच अन्न विषबाधा असल्याचा कोणचाही अहवाल नसून व्हिसेराचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.
(३) प्रश्न उद्भ्वत नाही.

---

**हिंगोली जिल्ह्यातील शालेय पोषण आहार योजने अंतर्गत देण्यात येणाऱ्या इंधन, भाजीपाला व स्वयंपाकी यांच्या थकित देयकाबाबत**

**(६) ९२४४८ (२३-०८-२०१७) श्री.तानाजी मुटकुळे (हिंगोली), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यातील शालेय पोषण आहार योजने अंतर्गत इंधन, भाजीपाला व स्वयंपाकी यांची देयके थकल्यामुळे शिक्षकांना भाजीपाला व इतर साहित्य उधारीवर खरेदी करावे लागत असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याचा विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शालेय पोषण आहार, कामगारांचे वेतन, अन्नधान्य तसेच इतर प्रलंबित मागण्या संदर्भात दिनांक १३ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास हिंगोली येथील जिल्हा परिषद कार्यालयावर मोर्चा काढण्यात येऊन निवेदन देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (२३-०१-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शिक्षकांची पदोन्नती आणि वेतनवाढ शाळासिध्दीनुसार 'अ' दर्जाच्या शाळांतील शिक्षकांनाच देण्याच्या निर्णयाबाबत**

**(७) ९८६३० (२९-१२-२०१७) श्रीमती संगीता ठोंबरे (केज), श्री.राजु तोडसाम (अर्णी), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षकांच्या पदोन्नत्या व वेतनवाढ शाळासिध्दीनुसार 'अ' दर्जाच्या शाळांतील शिक्षकांनाच देण्याचा निर्णय शिक्षण विभागाने जाहिर केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील 'अ' दर्जाच्या ३४ हजार शाळांचे अद्यापही बाह्यमुल्यमापन झालेले नसल्यामुळे शाळासिध्दी मधील श्रेणीबाबत शिक्षकांकडूनच प्रश्न उपस्थित केल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थ्यांच्या व शाळेच्या गुणवत्तेचा संबंध शिक्षकांच्या पदोन्नतीसाठी ग्राह्य धरणाऱ्या शासन निर्णयास शिक्षकांनी विरोध केला असून हा निर्णय मागे न घेतल्यास राज्यभर आंदोलन करण्याचा इशारा दिल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-०१-२०१९) :** (१) होय.
(२) होय.
(३) होय.
(४) या संदर्भातील प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील वैधमापन कार्यालयास जागा देणेबाबत**

**(८) १०७३६६ (१८-०४-२०१८) श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर येथील वैधमापन कार्यालयास शासनामार्फत १ कोटीचा निधी मंजूर करण्यात आला आहे मात्र जागा देण्याचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावावर अंतिम निर्णय झाला आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार कोल्हापूर येथील वैधमापन कार्यालयास जागा देवून वैधमापन कार्यालय उभारणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश बापट (२२-११-२०१८) :** (१) नाही, हे खरे नाही.
(२), (३) व (४) सहायक नियंत्रक यांनी दि.१/२/२०१३ रोजी कोल्हापूर शहरातील ४ निरीक्षक, वैधमापन शास्त्र विभागांसाठी व प्रयोगशाळेसाठी जागेच्या मागणीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना सादर केला होता. तथापि, जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी सदर प्रस्ताव अमान्य केलेला आहे.

जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडे नविन जागा उपलब्ध करून देण्याची विनंती करण्यात आलेली आहे.सद्यस्थितीत सहायक नियंत्रक, वैध मापन शास्त्र, कोल्हापूर यांचे कार्यालय सी वार्ड, हत्तीमलरोड, कोल्हापूर येथे असून सदर जागा सोईची व सुस्थितीत आहे.

---

## अहमदनगर जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागातील अखर्चित निधी परत गेल्याबाबत

**(९) १०७८८२ (१४-०४-२०१८) श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागात आलेला रुपये एक कोटी १० लाख रुपयांचा निधी दोन वर्षात खर्च न झाल्याने परत गेल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, याबाबत दोषींविरुध्द काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०९-०१-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) जिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्याकडुन अहमदनगर जिल्हयातील दूषित पाणी असलेल्या ५० गावांमध्ये जलशुध्दीकरण यंत्रणा बसविण्यासाठी जिल्हा परिषदेकडे रु. १३८.०० लक्ष इतका निधी वर्ग करण्यात आलेला आहे.

सदर जलशुध्दीकरण यंत्रणासाठी ५ वेळा निविदा मागवूनही फक्त १० संयंत्राकरिता निविदा प्राप्त झाल्याने अहमदनगर जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागात निधी रु. ११०.०० लक्ष शिल्लक आहे. सदरचा निधी परत गेलेला नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक जिल्हयातील नांदगांवसह इतर ५६ खेड्यांच्या पाणी पुरवठा योजनेच्या नुतनीकरणासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(१०) १०९४४५ (१९-०४-२०१८) श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम कृती आराखडा सन २०१७-१८ अंतिम करण्याच्या अनुषंगाने State Level Scheme Sanctioning Committee (SLSSC) ची बैठक दिनांक २ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास संपन्न झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बैठकीमध्ये नाशिक जिह्यातील नांदगांव व ५६ खेडी पाणी पुरवठा योजनेच्या नुतनीकरणासाठी (नांदगांव/मालेगांव/देवळा) या योजनेचा कृती आराखड्यात समावेश करण्यासाठी मंजुरी देण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त योजनेच्या नुतनीकरणाकरिता निधी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागास उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बबनराव लोणीकर (०९-०१-२०१९) :** (१) होय,

(२) होय,

(३) नांदगाव, मालेगाव व देवळा तालूक्यातील ५६ गावे या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या कामासाठी जिल्हा नियोजन समितीकडून मागणी केलेला निधी प्राप्त झाला नाही. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम सन २०१८-१९ च्या कृती आराखड्यामध्ये रु. ६०० लक्ष खर्चाच्या कामाचा समावेश करण्यात आला आहे. सदर योजनेचे सर्वेक्षण अंदाजपत्रक तयार करण्यासाठी रु. ४१.२४ लक्ष एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मालेगांव (जि.नाशिक) तालुक्यात स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत वैयक्तिक शौचालयाकरिता लाभार्थ्यांना अनुदान वितरीत करण्याबाबत

**(११) १०९७११ (१४-०४-२०१८) श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) येथे स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत वैयक्तिक शौचालय बनविणेसाठी माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कारणास्तव किती अर्ज प्राप्त झाले, त्यापैकी किती अर्ज पात्र ठरले तसेच किती लाभार्थींना अनुदान वितरीत करण्यात आले आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१९-११-२०१८) :** (१) व (२) पायाभूत सर्वेक्षण २०१२ नुसार त्यावेळी वैयक्तिक शौचालय उपलब्ध नसलेल्या कुटुंबांची यादी तयार करण्यात आली आहे. सदर यादीमध्ये अंतर्भूत लाभार्थी कुटुंबांने शौचालय बांधकाम केल्यानंतर स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) या योजने अतंर्गत प्रोत्साहन रक्कमेसाठी लाभार्थ्यांकडून संबंधित ग्रामपंचायतींना अर्ज सादर केले जातात. सदर वैयक्तिक शौचालयांची तांत्रिक तपासणी झाल्यानंतर आणि फोटो काढून केंद्र शासनाच्या संकेतस्थळावर अपलोड केल्यानंतर प्रोत्साहन रक्कम थेट लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा करण्यात येते.

मालेगांव तालुक्यातील ग्रामीण भागात २०१७-१८ या वित्तीय वर्षात एकूण १४,४२७ लाभार्थ्यांना प्रत्येकी रु.१२,०००/- याप्रमाणे एकूण रु.१७,३१,२४,०००/- (सतरा कोटी एकतीस लाख चोवीस हजार) इतकी प्रोत्साहन रक्कम देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील भेसळ प्रतिबंधक कायद्यामध्ये बदल करुन सदर**
**गुन्हा अजामीनपात्र करण्यासंदर्भात**

**(१२) ११०७४५ (१४-०४-२०१८) श्री.संतोष दानवे (भोकरदन), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुंबई व इतर महानगरांमध्ये शेजारील राज्य तसेच जिल्ह्यातून होणारा दूध पुरवठा भेसळयुक्त असल्याच्या तक्रारी राज्याच्या अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त यांच्याकडे ग्राहकांकडून प्राप्त झाल्यानंतर प्रशासनामार्फत दुधाचे नमुने घेऊन तपासण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अन्न आणि औषध प्रशासनाने मुंबईतील ५ जकात नाक्यावर दिनांक २० जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास 'जकात नाका दुध मोहिमे' दरम्यान केलेल्या तपासणीत अवघ्या आठ तासांत २८०० लिटर दुध सदोष आढळून आले असून तासगांव तालुक्यातील (जि.सांगली) डोर्ली येथे दुधपावडर, खादयतेल आणि अन्य वस्तूंचा वापर करुन बनावट दुधनिर्मिती करणा-या एका व्यक्तीवर मुख्य न्यायदंडाधिका-यांकडे खटला दाखल करण्यात आला असल्याचे दिनांक २२ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास आढळून आले आहे तसेच सोलापूर येथील सर्वाधिक दुध भेसळ होत असल्याची तक्रार प्राप्त झाल्यामुळे अन्न व औषधी प्रशासनाकडून मिल्क ड्राईव्ह (भेसळ) मोहिमे अंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील १४ दुध डेअरीमधील दुध नमुने तपासणीसाठी पुणे प्रयोग शाळेमध्ये पाठविण्यात आले असल्याचे दिनांक २० जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून नाशिक विभागात देखील दुध तपासणी मोहिम सुरु केली असल्याचे दिनांक २५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दुधात पाणी तसेच पावडर आणि खव्यात मैदा मिसळून भेसळीचा धंदा करणारे रॅकेट राज्यभर कार्यरत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच अन्नपदार्थामध्ये चवीकरीता मिसळण्यात येणाऱ्या अजिनोमोटोच्या वापरामुळे लहान मुलांच्या मेंदूवाढीवर तसेच मानवी शरीरावर विपरित परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अन्न आणि औषध प्रशासन विभागाच्या भेसळ प्रतिबंधक कायद्याखाली दाखल होणारा गुन्हा जामीनपात्र असल्याने भेसळ करणा-यांवर दंडात्मक कारवाई व्यतिरिक्त कोणतीच कोणतीही कारवाई होत नसल्याने भेसळ प्रतिबंधक कायद्यामध्ये बदल करुन सदर गुन्हा अजामीनपात्र करण्यासंदर्भात शासनाकडून कोणते प्रयत्न केले आहेत अथवा करण्यात येत आहेत,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच दूध व अन्न पदार्थांमध्ये होणा-या भेसळीवर प्रतिबंध घालण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२८-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) मुंबईतील ५ जकात नाक्यावर दुध तपासण्यासाठी माहे २०/०१/२०१८ ते २१/०१/२०१८ च्या दरम्यान मोहिम राबविण्यात आली होती. सदर मोहिमे मध्ये २८०० लिटर दुध स्निग्धांश मानकाप्रमाणे नसल्याचे आढळले आहे.

तासगांव तालुक्यातील (जि.सांगली ) डोर्ली येथे एका व्यक्तीवर मुख्य न्यायदंडाधिका-यांचेकडे दिनांक २२ जानेवारी, २०१८ रोजी खटला दाखल करण्यात आला आहे.

सोलापूर जिल्ह्यात सर्वाधिक दुध भेसळ होत असल्याची तक्रार अन्न व औषध प्रशासनास प्राप्त झालेली नाही. सोलापूरमध्ये प्रशासनामार्फत माहे जानेवारी, २०१८ मध्ये विशेष दुध मोहिमे अंतर्गत २८ नमूने घेवून सोलापूर येथील प्रयोगशाळेत पाठविण्यात आले होते.

अन्न व औषध प्रशासनामार्फत नाशिक विभागात माहे, २०१८ मध्ये दुध तपासणी मोहिम राबविण्यात आली आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

(५) अन्न सुरक्षा व मानके कायद्याची दुरुस्ती करण्याची बाब केंद्र शासनाच्या अखत्यारीत असल्याने शिक्षेच्या वाढीसाठीचा प्रस्ताव केंद्र शासनास पाठविण्यात आला आहे.

(६) बृहन्मुंबई विभागाने मुंबईतील ५ जकात नाक्यावर दुध मोहिमेत दुधाची गुणवत्ता तपासण्यासाठी माहे २०/०१/२०१८ ते २१/०१/२०१८ च्या दरम्यान मोहिम राबविण्यात आली. सदर मोहिमे दुधाचे ८ नमुने घेण्यात आले होते. त्यापैकी ०५ नमुन्यांचे अहवाल प्रमाणित प्राप्त झाले असून ०२ अप्रमाणित प्राप्त झाले आहेत तर ०१ नमुन्याचा अहवाल प्रलंबित आहे. अप्रमाणितबाबत एका प्रकरणी रु.२०,०००/- दंड आकारण्यात आला असून एका प्रकरणी न्यायनिर्णय खटला दाखल करण्यात आला आहे.

दि.२६/०९/२०१७ रोजी डोर्ली (जि.सांगली) येथे श्रीयश दुधसंकलन केंद्र येथून गायदुध २, पांढरे द्रावण (अपमिश्रके), व्हे पावडर (अपमिश्रके), री. पामकर्नेल ऑइल (अपमिश्रके), रि.सुर्यफुल तेल (अपमिश्रके) यांचे नमुने घेऊन उर्वरीत साठा जप्त करण्यात आला होता. सदर पेढीने विनापरवाना व्यवसाय करत असल्यामुळे श्रीयश दुधसंकलन केंद्राचे मालका विरुध्द सांगली मुख्यन्याय दंडाधिकाऱ्याकडे खटला दाखल करण्यात आला आहे. उपरोक्त दोन्ही अहवाल प्राप्त झाले असून कमी दर्जाचे आढळून आले आहेत. अप्रमाणित नमुन्यासंदर्भात व अपमिश्रकांचे नमुने प्रकरणी न्यायनिर्णय अधिकारी, पुणे यांचेकडे दि.२२.०२.२०१८ खटला दाखल करण्यात आला आहे.

सोलापूर जिल्ह्यात सर्वाधिक दुध भेसळ होत असल्याची तक्रार अन्न व औषध प्रशासनास प्राप्त झालेली नाही. प्रशासनाने माहे जानेवारी, २०१८ मध्ये विशेष दुध मोहिमे अंतर्गत २८ नमूने घेवून सोलापूर येथील प्रयोगशाळेत पाठविण्यात आले होते. त्यापैकी ०४ नमुने कमी दर्जाचे आढळून आले. सदर नमुनेबाबत न्यायनिर्णय खटले दाखल करण्यात येत आहेत.

नाशिक विभागात सर्व जिल्ह्यांमध्ये माहे जानेवारी, २०१८ या कालावधीत विशेष मोहिमेमध्ये १९ नमूने कमी दर्जाचे आढळून आले आहेत. त्यापैकी ०५ प्रकरणे न्यायनिर्णयासाठी दाखल करण्यात आली असून ०२ प्रकरणी दंड आकारण्यात आला आहे व ०१ प्रकरणाचा अहवाल प्रलंबित आहे. उर्वरीत ११ प्रकरणी तपास/चौकशी सुरु आहे.

---

**लोणार तालुक्यातील (जि. बुलढाणा) गावांमध्ये शौचालयाचा वापर होत नसल्याबाबत**

**(१३) ११२९४२ (१५-०४-२०१८) डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोणार (जि. बुलढाणा) तालुक्यातील गुंधा, हिरडव, उदनापूर, वाल्हूर, कोयाळी दहोतोडे, हत्ता, तांबोळा, वेणी, सरस्वती, मातमळ, किन्ही, शारा, हिवराखंड, अंजनी खुर्द, शिवनी पिसा, मोहोतखेड आदि गावात शौचालयाचा वापराकडे दुर्लक्ष होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तालुक्यात शौचालयाचा वापर करीत नसल्यामुळे गावात अस्वच्छता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त गावांमध्ये शौचालयाचा वापर करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१९-११-२०१८) :** (१), (२) व (३) लोणार (जि.बुलढाणा) तालुक्यातील गावामध्ये डिसेंबर, २०१७ पूर्वी सर्व कुटुंबांनी वैयक्तिक शौचालय बांधकाम केले नव्हते.

लोणार तालुक्यामध्ये एकूण २३,५६८ कुटुंबे असून त्यापैकी २३५२१ कुटुंबांनी दिनांक ३१ मार्च, २०१८ पर्यंत वैयक्तिक शौचालय बांधकाम केले. उर्वरीत ४७ कुटुंबांना सामूहिक/इतर शौचालये उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत.

विविध यंत्रणेव्दारे राज्यातील ग्रामीण भागात स्वच्छतेचा प्रसार करणे व जनतेमध्ये स्वच्छतेच्या सवयी रुजवणे यासाठी प्रयत्न करण्यात येतात. माहिती, शिक्षण व संवाद अंतर्गत आंतरव्यक्ती संवादाच्या माध्यमातून घरोघरी जाऊन वैयक्तिक स्वच्छता, सार्वजनिक स्वच्छता, शौचालय बांधकाम, परिसर स्वच्छता यासाठी ग्रामस्थांचे प्रबोधन कण्यात येते. तसेच जिल्हास्तरावरुन ग्रामपंचायतींना भेटी देणे, झालेल्या कामाची शौचालयाच्या वापराच्या दृष्टीने पाहणी करणे, आढावा घेणे इत्यादीं बाबी करण्यात येतात. प्रत्येक गावात स्वच्छाग्रहींची नेमणूक करुन त्यांच्याव्दारे ही स्वच्छतेची विविध कामे करुन घेण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर जिल्हयासाठी स्वतंत्र ग्राहक तक्रार निवारण मंच स्थापन करण्याबाबत**

**(१४) ११४७३३ (२०-०४-२०१८) श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयासाठी स्वतंत्र ग्राहक तक्रार निवारण मंच स्थापन करण्याची मागणी होत असल्याचे दिनांक २ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त तक्रार निवारण मंच स्थापन करण्याबाबत व ग्राहकांच्या तक्रारी निवारणासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२०-१२-२०१८) :** (१) हे, खरे आहे,

(२) व (३) जिल्हाधिकारी कार्यालय पालघर यांच्याकडे पालघर जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच स्थापन करण्याकरीता जागेची मागणी केली असता, नवीन प्रशासकीय इमारत तयार होण्यास व मंचास जागा उपलब्ध होण्यास काही कालावधी लागणार असल्याने सद्य:स्थितीत भाडेतत्वावर जागा घेऊन मंचाचे कामकाज सुरु करण्याचे सुचविले आहे. पालघर येथे जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच स्थापन करण्याची कार्यवाही सुरु असून, या कार्यालयासाठी आवश्यक ती पदनिर्मिती करण्याची कार्यवाही सुरु आहे.

पालघर जिल्हयातील ग्राहक सद्य:स्थितीत जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, ठाणे येथे तक्रार दाखल करीत आहेत.

---

**सांगली जिल्हयात ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने खर्च केलेल्या निधीसंदर्भातील कागदपत्रे लेखा परिक्षणासाठी सादर केली नसल्याबाबत**

**(१५) ११४७७४ (२५-०४-२०१८) श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयात ग्रामीण पाणीपुरवठा विभागासाठी कोटयवधी रुपयांचा निधी खर्च करण्यात आला असतांना १८५ प्रकरणातील कागदपत्रे लेखा परिक्षणासाठी सादर केलेली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षण विभागात शालेय विदयार्थी संख्या व गणवेश खरेदीत १२ हजारांची तफावत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच झोपडपट्टीवासियांना देण्यात येणा-या घरकुलांच्या ठेकेदाराला प्रतिचौरस फूट हजार रुपयांप्रमाणे बांधकामाचा दर दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०१-०१-२०१९) :** (१) होय.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही, झोपडपट्टीवासियांना घरकुल योजनेसाठी ग्राम विकास विभाग/ गृहनिर्माण विभाग व नगर विकास विभागाकडून प्रति चौरस फुट हजार रुपये दर देण्यात आलेला नाही.
(४) लेखा परिक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात न आलेल्या प्रमाणकांची आर्थिक व भौतिक विशेष तपासणी करण्यात आली आहे. १८५ प्रकरणी कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यात आली नसल्याबाबत जबाबदार अधिकारी व कर्मचारी यांच्याविरुध्द मुंबई स्थानिक निधी लेखा परिक्षण अधिनियमानुसार एक वेतनवाढ रोखून ठेवण्याची शास्ती करणे व दंडाची रक्कम वसूल करण्यासाठी विभागीय आयुक्त, पुणे यांनी मान्यता दिलेली आहे व त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील सागरी नियमन क्षेत्र निकषात केलेल्या**
**बदलांची अंमलबजावणी करण्याबाबत**

**(१६) ११६६३२ (२३-०७-२०१८) श्री.मनोहर भोईर (उरण), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.संजय कदम (दापोली), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :**
सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने केरळ व कर्नाटकच्या धर्तीवर किनारपट्टीवर पूर्वापार राहणा-या भूमिपुत्रांना व त्यांच्या पारंपारिक व्यवसायाला संरक्षण मिळावे या उद्देशाने सागरी नियमन क्षेत्र (सीआरझेड) निकषात केलेल्या बदलानुसार कांही विशिष्ट क्षेत्रातील बांधकाम संदर्भातील जाचक अट दूर करुन ५०० मीटर वरुन ५० मीटरवर आणण्याचा केलेला कायदा समुद्रकिनारी पूर्वापार राहणा-या नागरिकांना हानीकारक असल्याचे दिनांक ८ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निर्णयामुळे राज्यातील सुमारे १५०० हेक्टर जमीन उपलब्ध होणार आहे तसेच यामुळे मुंबई व कोकणातील विस्तीर्ण समुद्रकिनाऱ्यावरील क्षेत्राला याचा कसा व किती लाभ होणार आहे,

(३) असल्यास, राज्यातील किनाऱ्यावरील तापमान वाढून समुद्राच्या पातळीत वाढ होणार असल्याने मुंबई तसेच किनारपट्टीवरील शहरांत महाप्रलय, सुनामी, चक्रीवादळे येऊन समुद्रातील सांडपाणी व कचऱ्याच्या प्रमाणात वाढ होऊन मासेमारी व्यवसायावर त्याचा अनिष्ट परिणाम होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कायद्यातील अटींची तात्काळ अंमलबजावणी होणे तसेच सीआरझेडची मर्यादा शिथिल करताना पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी दृष्टीने केंद्र व राज्य शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (२९-०१-२०१९) :**(१) नाही, सिआरझेड अधिसुचना, २०११ नुसार समुद्राच्या भरतीरेषेपासून जमीनीकडील भागात ५०० मीटर पर्यंत सिआरझेड मर्यादा आहे.

(२) प्रश्न उदभवत नाही. तसेच केंद्र शासनाने प्रारुप सिआरझेड अधिसूचना २०१८ अद्याप अंतिम केलेली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे येथील औषध प्रशासन कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून औषध दुकानदारांना होत असलेला त्रास**

**(१७) ११८७३२ (२०-०७-२०१८) श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील औषध प्रशासन कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून होत असलेली छळवणुक तसेच राज्यातील औषध दुकान व्यवस्थापनांना भेडसावणा-या समस्यांच्या निषेधार्थ दिनांक १७ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास औषध दुकानदारांनी दुकाने बंद ठेवून आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारण काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१७-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात औषधांवर नियंत्रण ठेवणारी यंत्रणा अस्तित्वात नसल्याबाबत**

**(१८) ११९८९३ (२०-०७-२०१८) श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.बाळासाहेब सानप (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषत: मुंबईत औषधांच्या ब्रँडच्या नावातील साधर्म्यामुळे संभ्रम निर्माण होऊन चुकीचे औषध दिले जाऊन रुग्णांच्या जिवास धोका निर्माण झाल्याची भीती औषध विक्रेत्यांकडून व्यक्त होत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अन्न व औषध प्रशासनाने ब्रँडच्या नावावर कोणतेही बंधन नसून केवळ जेनरिक नावावर बंधने ठेवण्याची परवानगी असल्याचे स्पष्ट केल्यामुळे नाम साधर्म्यामुळे औषधांवर नियंत्रण ठेवणारी यंत्रणा अस्तित्वात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रामुख्याने ॲलोपॅथी, जेनेरिक व आयुर्वेदिक औषधांच्या नावांमध्ये साधर्म असले तरी त्याचा वेगवेगळ्या उपचाराकरिता वापर केला जातो, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्यामुळे औषध विक्रत्याकडून रुग्णांना चुकीची औषधे दिली जाऊन त्याच्या सेवनाने रुग्णाचा मृत्यू होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२८-११-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही.
(३) होय.
(४) व (५) होय, अशी एक घटना अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आली आहे.

त्यानुषंगाने प्रशासनाने तपास केला असून डॉक्टरांनी Vitamin घटक असलेली Tablet लिहून दिले असता, औषध विक्रेत्यांने नामसाधर्म्य असलेली कर्करोगाच्या उपचारासाठी असलेला मुळ घटक असलेली Tablet दिल्याचे आढळून आले.

सदर प्रकरणी औषधे विक्रेत्याचे परवाने रद्य करण्यात आले आहेत. तसेच मालाड पोलिस स्टेशन येथे दि.०७/०७/२०१८ रोजी पेढीचे कर्मचारी व पेढीचे भागादीर यांच्याविरुध्द प्रथम खबर अहवाल नोंदविण्यात आला असून गुन्हा क्र.३५७/२०१८ असा आहे. सदर प्रकरणी पोलिस पुढिल तपास करत आहेत.

---

## मुंबईतील रक्त पेढयांच्या तपासणीबाबत

**(१९) १२०७३१ (२०-०७-२०१८) श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील ५५ टक्के रक्त पेढ्यांची अन्न व औषध प्रशासनाने मागील कांही महिन्यांमध्ये तपासणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तपासणीत काय आढळून आले व त्यानुषंगाने किती रक्त पेढ्यांवर कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२७-११-२०१८) :**(१) अन्न व औषध प्रशासनामार्फत मुंबई कार्यक्षेत्रातील दि.०१/०१/२०१८ ते दि.३१/०५/२०१८ पर्यंत एकूण ७६ % रक्तपेढ्यांची तपासणी करण्यात आली आहे.

(२) उक्त कालावधीत रक्तपेढ्यांच्या केलेल्या तपासणीमध्ये ३२ पेढ्यांचे दोष गंभीर स्वरुपाचे नसल्याने सदर दोषाचे निराकारण करण्याबाबत संबधित पेढ्यांना कळविण्यात आले होते. त्यानुषंगाने संबधित पेढ्यांनी दोषाचे निराकरण केले आहे.

दि.०१/०१/२०१८ पूर्वी तपासणी करण्यात आलेल्या २ रक्तपेढ्यांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भ्वत नाही.

---

## रत्नागिरी जिल्हा कृषी औद्योगिक सर्व सेवा सहकारी संघ लि., यांना थकीत भाड्याची रक्कम देण्याबाबत

**(२०) १२३१५१ (२८-०७-२०१८) श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील शासन आधारभूत किंमत खरेदी योजनेखाली खरेदी विक्री संघांनी भात साठवणुकीसाठी घेतलेल्या गोदामाच्या भाड्याची रक्कम सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे भाडे दाखल्याप्रमाणे सुमारे रुपये ६८.४० लाख सन २०१०-११ पासून थकीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची थकीत रक्कम मिळणेबाबत रत्नागिरी जिल्हा कृषी औद्योगिक सर्व सेवा सहकारी संघ लि., रत्नागिरी यांनी महाराष्ट्र स्टेट को.ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन लि.,मुंबई यांचेकडे वारंवार मागणी करूनही अद्याप थकीत रक्कम मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, केंद्र शासनाच्या सुधारीत दराप्रमाणे संघाला देण्यात येणारी भाड्याची रक्कम ही अत्यंत अल्प (फक्त रु.३.३३ लाख) असून त्यामध्ये संघाला भाड्यापोटी सुमारे रुपये ६५.०७ लाख कमी मिळणार असल्याने मोठे आर्थिक नुकसान होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मागील सहा वर्षापासून भाड्याची रक्कम थकीत असून आता भाड्याला मर्यादा घालून गोदामांचे भाडे दर कमी केले असल्यामुळे खरेदी विक्री संघाची एकप्रकारे फसवणूक होऊन ते आर्थिक संकटात सापडले आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रत्नागिरी जिल्हा कृषी औद्योगिक सर्व सेवा सहकारी संघ लि.,रत्नागिरी संघांला सार्वजनिक बांधकाम विभाग यांना भाडे दाखल्याप्रमाणे थकीत भाड्याची रक्कम देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२९-११-२०१८) :** (१), (२), (३) व (४) हंगाम २०१०-११ ते २०१३-१४ या कालावधीत महाराष्ट्र राज्य को-ऑप मार्केटिंग फेडरेशनकडून धानाची साठवणूक करण्याकरिता रत्नागिरी जिल्हयातील सब एजंट संस्थाची एकूण २० गोदामे भाडयाने घेण्यात आली होती. त्यांची एकूण गोदाम भाडयाची रक्कम रु.६८,८३,०८९/- देय होती. सदर रक्कमेपैकी रु.४५,००,१६३/- अदा करण्यात आली आहे. उर्वरित रक्कम रु.२३,८२,९२६/- चे गोदाम भाडे प्रस्ताव संस्थांकडून अप्राप्त आहेत. सदरचे प्रस्ताव प्राप्त करुन घेऊन गोदाम भाडयाच्या रक्कमा अदा करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

सद्य: स्थितीत रत्नागिरी जिल्हा कृषि औद्योगिक सर्व सेवा सहकारी संघ लि.रत्नागिरी यांच्या मालकीच्या दोन गोदामांचे गोदाम भाडे एकुण रक्कम रु.१३,८०,१८२/- पैकी रु.९,०९,७४१/- संस्थेला अदा करण्यात आलेली आहे. उर्वरित रक्कम रु.४,७०,४४२/- चे प्रस्ताव प्राप्त होताच गोदाम भाडयाच्या रक्कमा अदा करण्याची कार्यवाही करण्यात येईल.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नायगाव पूर्व येथील चंद्रपाडा व वाकीपाडा (ता.वसई, जि.पालघर) गावांसाठी पेल्हार धरणांतून पाणीपुरवठा करण्याबाबत

**(२१) १२३५८९ (२५-०७-२०१८) श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नायगाव पूर्वेकडील (ता.वसई, जि.पालघर) चंद्रपाडा-वाकीपाडा या गावातील महापालिकेच्या पेल्हार धरणातून पाणीपुरवठा करण्यासाठी स्थानिक ग्रामस्थांनी लोकप्रतिनिंधीमार्फत शासनाकडे सातत्याने निवेदनाद्वारे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातर्फे वसई तालुक्यातील ६९ गावांच्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेंतर्गत चंद्रपाडा व वाकीपाडा गावांचा समावेश असूनही सदरहु गावातील ग्रामस्थांना अद्यापही पाणीपुरवठा करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०५-११-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर योजनेचे भौतिकदृष्ट्या ९८ टक्के काम पूर्ण झाले आहे. नायगाव पुर्वेकडील चंद्रपाडा व वाकीपाडा या गावांना पाणी पुरवठा करण्यासाठी पेल्हार धरण उद्भवापासून ६९ गावांच्या पाणी पुरवठा योजने अंतर्गत समाविष्ट २० गावांकरीता टाकलेल्या गुरुत्ववाहीनीच्या चाचणीचे काम हाती घेण्यात आले आहे. सद्य:स्थितीत पेल्हार उद्भवावरुन जूचंद्रपर्यंत पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे. जूचंद्र ते चंद्रपाडा या रस्त्याच्या रुंदीकरणामुळे तुटलेल्या गुरुत्ववाहीनीचे काम हाती घेण्यात आले आहे. चंद्रपाडा-वाकीपाडा या गावांना माहे डिसेंबर, २०१८ अखेरपर्यंत पाणी पुरवठा सुरु करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्ह्यात जलशुध्दीकरण यंत्र (आर.ओ.मशिन) बसविण्याबाबत

**(२२) १२३८५३ (२५-०७-२०१८) श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यात पिण्याचे पाणी शुद्ध आहे का याची तपासणी दरवर्षी पाण्याच्या विविध स्त्रोतांतील पाण्याचे नमुने तपासून केली जात असून माहे एप्रिल, २०१८ च्या अहवालानुसार जिल्ह्यातील २४९ तालुक्यांपैकी खेड तालुक्यात ५३, शिरूर तालुक्यात ३७ व इतर १९० गावांमध्ये पाण्याचे स्त्रोत दुषित असल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुषित पाण्यामुळे पोटदुखी, जुलाब व विषमज्वर यांसारखे आजार उद्भवत असल्याने नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी जिल्ह्यातील नागरीकांना शुध्द पाणी उपलब्ध होण्याच्यादृष्टीने जलशुध्दीकरण यंत्र (आर.ओ.मशिन) बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१४-११-२०१८) :** (१) हे अशंत:खरे आहे.

पुणे जिल्हयातील शिरूर तालुक्यातील ११ गांवामध्ये ३७ स्त्रोत व खेड तालुक्यातील ३१ गावांमध्ये ५३ स्त्रोत, तसेच इतर १२३ गावांमध्ये १९० स्त्रोत दूषित आढळले असून या पाण्याचा पिण्यासाठी वापर करण्यात येत नाही. जिल्हयात दूषित पाणी पुरवठा होण्याचे प्रमाण अत्यल्प आहे. याबाबत वेळोवेळी योग्य ती खबरदारी घेतली जाते. जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखालील ग्रामपंचायतेमार्फत ग्रामीण भागात शुध्द पाणी पुरवठा केला जात आहे.

(२) हे खरे नाही.

ग्रामपंचायत स्तरावर टी.सी.एल.पावडर द्वारे सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे शास्त्रोक्त पध्दतीने शुध्दीकरण केल्यामुळे तसेच स्त्रोताभोवतीचा परिसर स्वच्छ केलेला असल्यामुळे पोटदुखी, जुलाब व विषमज्वर यांसारखे आजार उद्भवत असल्याचे निदर्शनास आलेले नाही. नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाल्याचे निदर्शनास आलेले नाही. ग्रामपंचायत स्तरावर टी.सी.एल पावडर द्वारे शुध्द पाणी उपलब्ध करून देण्यात येते.

(३) पुणे जिल्हयातील ६ तालुक्यात विविध योजनांतून १४६ पाणी शुध्दीकरण यंत्र (R.O.) बसविण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## परभणी जिल्यात अन्नसुरक्षा व मानके कायद्याची अंबलबजावणी करण्यासाठी जिल्हास्तरीय सुकाणू समिती स्थापन करण्याबाबत

**(२३) १२५५३८ (०१-०८-२०१८) डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

**(१)** परभणी जिल्हयात अन्नसुरक्षा व मानके कायद्याची कडक अंबलबजावणी करण्यासाठी जिल्हास्तरीय सुकाणू समिती स्थापन करणे आवश्यक असतांनाही त्याकडे जिल्हयातील अधिकारी दुर्लक्ष करीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत महालेखाकार, नागपूर यांनी त्याच्या अहवालात आक्षेप नोंदविले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार परभणी जिल्हयात सुकाणू समिती स्थापन करण्यासह यास विलंब करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१७-१०-२०१८) :** (१) नाही.

परभणी जिल्हयात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती स्थापन करण्यात आलेली आहे.

(२) परभणी कार्यालयाचे महालेखापाल, नागपूर यांनी दि.०१.०१.२०११ ते ३०.११.२०१३ या कालावधीचे ऑडिट दि.०५.१२.२०१३ ते दि.०९.१२.२०१३ या कालावधीत केले असून सदर ऑडीट रिपोर्ट मध्ये महालेखापाल यांनी परभणी येथील समितीबाबत आक्षेप नोंदविलेला नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भ्वत नाही.

---

**राज्यातील प्रत्येक शाळेत समुपदेशक उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२४) १२६५१२ (०६-१२-२०१८) श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अभ्यासक्रमाची निवड, शाखा निवड याबाबत संभ्रमात असलेल्या विद्यार्थ्यांचे व्यवसाय मार्गदर्शन संस्थेकडून समुदेशन करण्यात येऊन विद्यार्थ्यांची आवड, कल, क्षमता लक्षात घेऊन त्यांना योग्य मार्ग निवडता यावा याकरिता काही मानसशास्त्रीय चाचण्या संस्थेकडून तयार करण्यात आल्या असून सदर संस्था राज्यात मुंबई, पुणे, औरंगाबाद, अमरावती, नागपूर, कोल्हापूर आणि लातूर या ठिकाणी कार्यरत असताना उक्त संस्था विभागीय विद्या प्राधिकरणांमध्ये माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान विलीन केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, व्यवसाय मार्गदर्शन आणि निवड संस्था बंद करण्यास शिक्षण क्षेत्रातून मोठ्या प्रमाणावर विरोध आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विभागीय विद्या प्राधिकरण या संस्थेतून शिक्षकांचे समुपदेशन होणार असून, विद्यार्थ्यांचे समुपदेशन करणे तसेच त्यांच्या मानसशास्त्रीय चाचण्या करण्याचे काम विशिष्ठ खाजगी संस्थेला देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रत्येक शाळेत समुपदेशक उपलब्ध व्हावेत याकरिता शिक्षण विभागाने ही योजना अविरत चालू ठेवण्याचा केलेला प्रयत्न शासनाच्या या निर्णयामुळे बंद झाला असून अभ्यासक्रम ऑनलाईन केले असले तरी समुपदेशन हा प्रात्यक्षिकावर आधारित घटक असताना तो ऑनलाईन शिकून परिणाम साधता येणार नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार 'व्यवसाय मार्गदर्शन' संस्था पुन्हा सुरु करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (२३-०१-२०१९) : (**१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) प्रश्न उद्धवत नाही.

---

**भुदरगड (जि. कोल्हापूर) तालुक्यातील ३६३ विद्यार्थी पाठ्यपुस्तकांपासून वंचित असल्याबाबत**

**(२५) १२६५९७ (०५-१२-२०१८) श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुदरगड (जि. कोल्हापूर) तालुक्यातील ३६३ विद्यार्थी सर्व शिक्षा अभियानांतर्गत इयत्ता पहिली ते आठवी पर्यंत पुरविण्यात येणाऱ्या पाठ्यपुस्तकांपासून वंचित राहिले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची पाठ्यपुस्तके वेळेत पुरवठा न झाल्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार पुस्तकांचा पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (२०-१२-२०१८) : (**१) हे खरे आहे.

(२) व (३) मागील वर्षाच्या पटसंख्येनुसार विद्यार्थी संख्या निश्चित करुन पुढील वर्षी पाठ्यपुस्तकांची मागणी नोंदविण्यात येते. त्यानुसार पंचायत समिती, भुदरगड जि. कोल्हापूर येथील विद्यार्थ्यांना माहे जून, २०१८ मध्ये पाठ्यपुस्तके वितरीत करण्यात आली. तथापि, जून, २०१८ मध्ये ३९३ इतकी पटसंख्या वाढल्याने सदर विद्यार्थ्यांना विलंबाने पाठ्यपुस्तके उपलब्ध करुन देण्यात आली.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील मराठी शिक्षकांना गुजराती चॅनलवरुन प्रशिक्षण देण्याच्या निर्णयाबाबत**

**(२६) १२६६७७ (०६-१२-२०१८) श्री.हसन मुश्रीफ (कागल), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पहिली ते आठवी पर्यंत शिकविणाऱ्या मराठी शिक्षकांना बदललेल्या अभ्यासक्रमाचे गुजराती चॅनलवरुन प्रशिक्षण देण्याचा निर्णय शासनाने दिनांक २४ सप्टेंबर २०१८ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील शिक्षकांना सह्याद्री वाहीनीसह अन्य मराठी वाहीन्यांना डावलून "वंदे गूजरात" या गुजराती वाहिनीच्या माध्यमातून प्रशिक्षण देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-०१-२०१९) : (**१) हे खरे आहे.
(२) इयत्ता पहिली ते आठवीचे पुनर्रचित पाठ्यपुस्तक प्रशिक्षणाच्या प्रक्षेपणाची सुविधा 'वंदे गुजरात-१' या शैक्षणिक वाहिनीद्वारे विनाशुल्क उपलब्ध करून देण्यात आली आहे. सह्याद्री वा अन्य वाहिन्या या सशुल्क उपलब्ध आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे अहमदनगर येथील हेटी (खूर्सापा) (ता.काटोल, जि.नागपूर) शाळेत समायोजन करण्यात आलेली प्राथमिक शाळा पूर्ववत सुरु करण्याबाबत**

**(२७) १२६९३७ (१९-११-२०१८) श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे अहमदनगर (ता.काटोल, जि.नागपूर) येथील प्राथमिक शाळा आदिवासीबहुल वनग्राममध्ये असून या शाळेचे आता हेटी (खुर्सापा) या शाळेत समायोजन करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समायोजन करताना दोन्ही गावाचे अंतर १ कि.मी च्या आत असणे आवश्यक असताना हेटी या गावाचे अंतर १.५ कि.मी इतके आहे तसेच अहमदनगर हे गांव वनक्षेत्राशी जोडलेले असून या परिसरात हिंस्त्र पशूंचा वावर आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच हेटी या शाळेत जाताना विद्यार्थ्यांना जंगलातून जावे लागत असल्याने पालकांनी अहमदनगर येथील प्राथमिक शाळा पुर्ववत सुरु करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त मागणीवर कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२२-०१-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
(२), (३) व (४) सदर शाळा मुळ ठिकाणी पूर्ववत सुरु करण्याच्या मागणीसंदर्भात चौकशी करुन सदर शाळा मुळ ठिकाणी पूर्ववत सुरु ठेवण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शाळा अंगणवाडीतील स्वयंपाकी व मदतनीस यांच्या मानधनात वाढ करण्याबाबत**

**(२८) १२६९६२ (०५-१२-२०१८) श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासनाच्या विविध शाळा अंगणवाडीमध्ये शालेय पोषण आहार तयार करणा-या स्वयंपाकी व मदतनीस म्हणून काम करणा-या व्यक्तींना दरमहा रुपये १०००/- रुपये मानधन दिले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे मानधन वाढवून दरमहा किमान ३०००/- रूपये करण्यासाठी कर्मचा-यांनी वेळोवेळी शासनास निवेदन देऊनही याकडे दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अंगणवाडीमध्ये शालेय पोषण आहार तयार करणा-या स्वयंपाकी व मदतनीस यांच्या मानधनात वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-०१-२०१९) : (**१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत स्वयंपाकी तथा मदतनीस यांच्या मानधनामध्ये वाढ करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शेबा बु. (ता.नांदुरा, जि.बुलढाणा) येथील मध्यान्ह भोजनासाठी साठवलेल्या तांदूळ व इतर धान्यात पाली, भुंगे व उंदराची विष्ठा आढळल्याबाबत**

**(२९) १२८२३० (०४-१२-२०१८) डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेबा बु. (ता.नांदुरा, जि.नाशिक) येथील जिल्हा परिषदेच्या मराठी प्राथमिक शाळेतील विदयार्थ्यांच्या मध्यान्ह भोजनासाठी साठवलेल्या तांदूळ, मटकी व इतर धान्यात पालकांना पाली, भुंगे व उंदराची विष्ठा आढळल्याचे माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (२०-१२-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असून चौकशीनुसार दोषी आढळलेल्या मुख्याध्यापकास निलंबित करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डोल्हारा (ता.मोखाडा,जि.पालघर) केंद्र शाळेतील शालेय पोषण आहारात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(३०) १२८७६२ (१९-११-२०१८) श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुनिल केदार (सावनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डोल्हारा (ता.मोखाडा,जि.पालघर) येथील जिल्हा परिषदेच्या केंद्रशाळेतील मुख्याध्यापकांकडून शालेय पोषण आहारात गैरव्यवहार करण्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वारंवार अशा प्रकारचे गैरव्यवहार होत असल्याने या शाळेमध्ये शिक्षण घेणा-या विदयार्थ्याच्या आरोग्यावर पोषण आहाराविना विपरीत परिणाम होत आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर शाळेतील मुख्याध्यापकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१९-१२-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली असून चौकशीमध्ये दोषी आढळलेल्या मुख्याध्यापकास निलंबित करण्यात आले असून गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शिक्षकांना अद्ययावत प्रशिक्षण देण्यासाठी स्थापन केलेला तंत्रज्ञान कक्ष बरखास्त करण्याबाबत**

**(३१) १२९१९१ (०४-१२-२०१८) श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शिक्षण विभागातर्फे प्राथमिक व माध्यमिक विभागाच्या शिक्षकांना अद्यावत प्रशिक्षण देण्यासाठी तंत्रज्ञान कक्ष स्थापन करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शैक्षणिक तंत्रज्ञान विभागाच्या कक्ष अस्थापना वर्गांनी गत १६ वर्षात केवळ १४०० रुपये प्रशिक्षणावर खर्च केले असल्याचे माहिती अधिकारान्वये निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गत १६ वर्षात या विभागाने कोणतेही प्रशिक्षण आयोजीत केलेले नसन केवळ वेतनापोटी २५ कोटी रुपये शासनाला भुर्दंड पडला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदर कक्ष बरखास्त् करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, निलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-०१-२०१९) : (**१) होय.

(२) अंशत: खरे.

(३) हे खरे नाही.

(४) सन १९९५ पासून मुंबई दुरदर्शन केंद्रावरुन शाळेस चित्रवाणीचे प्रक्षेपण बंद झाले तसेच नवीन प्रशिक्षण धोरणामुळे जुन १९९५ पासुन प्रशिक्षणाबाबतची मागणी या संस्थेकडे आलेली नाही, त्यामुळे सदर कक्ष महाराष्ट्र शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, या संस्थेमध्ये विलिन करण्यात आले.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालेगाव (जि.नाशिक) येथे ईदगाहच्या कामाकरीता विशेष निधी मिळणेबाबत**

**(३२) १२९५३१ (०४-१२-२०१८) श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (जि.नाशिक) येथे ईदगाहच्या कामाकरीता विशेष निधी मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनधींनी माहे ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यादरम्यान मा. शालेय शिक्षण व अल्पसंख्यांक मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-०१-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाशिक जिल्हयातील दरेगाव शिवार, मालेगाव येथे इदगाह बांधकाम करण्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडून सविस्तर अहवाल मागविण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली जिल्हयातील शाळांनी शिक्षण विभागाकडे चुकीचे खाते क्रमांक दिल्याबाबत**

**(३३) १२९६१९ (०४-१२-२०१८) डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शाळांतून विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार योजनेंतर्गत दिल्या जाणाऱ्या खर्चाची रक्कम मुख्याध्यापकांच्या बँक खात्यावर जमा केली जाते परंतु हिंगोली जिल्हयातील २१२ शाळांनी शिक्षण विभागाकडे चुकीचे खाते क्रमांक दिल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने चुकीचे खाते क्रमांक दिलेल्या शाळांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-१२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत शाळा स्तरावर अन्न शिजविणाऱ्या यंत्रणेचे इंधन-भाजीपाला यासाठीचे अनुदान आणि नागरी भागातील धान्यादी मालाचे अनुदान राज्य स्तरावरुन थेट शाळा स्तरावर करण्याचा निर्णय घेण्यात आला असून यासाठी पात्र शाळांच्या बँक खात्याचा तपशील मागविण्यात आला आहे. तथापि, काही जिल्हयातील शाळांनी चुकीचा बँक खाते तपशील दिला होता. सदर तपशील तपासून त्यामध्ये दुरुस्ती करुन अद्ययावत तपशीलानुसार संबंधितांच्या बँक खात्यात अनुदानाची रक्कम जमा करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जयपूर (ता.मोताळा, जि.बुलढाणा) येथे नागरीकाचा उपासमारीने झालेला मृत्यु**

**(३४) १३०००८ (१९-११-२०१८). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जयपूर (ता.मोताळा, जि.बुलढाणा) येथील गोविंदा गवई यांचे आधार कार्ड जोडणी नसल्याने रेशनवरील धान्य न मिळाल्याने उपासमार होऊन मृत्यु झाल्याचे दिनांक २९ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मृत व्यक्तिच्या पत्नी श्रीमती पंचफुला गवई यांनी जिल्हाधिकारी, बुलढाणा यांना पतीचा भूकेनेच मृत्यू झाल्याची माहिती दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने कोणती कारवाई केली आहे,

(४) नसल्यास, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. गिरीश बापट (०५-०१-२०१८) : (**१) हे खरे नाही, मृतक गोविंदा गवई यांचा मृत्यू दिनांक २२.९.२०१८ रोजी झाला व मृत्यू भुकबळीने झाल्याची तक्रार लगेच नोंदविण्यात आलेली नसून मृत्यूच्या ७ दिवसानंतर दिनांक २८.९.२०१८ रोजी तक्रार तहसिल कार्यालय मोताळा, जि.बुलढाणा येथे नोंदविण्यात आली आहे. सदर मृत्यू भुकबळीने झाल्याचा शवविच्छेदन अहवाल नाही.

श्री.गोविंद गवई यांच्या शिधापत्रिकेची नोंद Ration card Management System (RCMS) या Online प्रणालीमध्ये करण्यात आलेली नव्हती.

(२) अशंत: खरे आहे, श्री.गोविंदा गवई, जयपूर (ता.मोताळा, जि.बुलढाणा) यांचा भूकबळी होवून मृत्यू झाल्याची माहिती दिली होती. उक्त तक्रारीचे अनुषंगाने जिल्हाधिकारी बुलढाणा यांनी चौकशीचे आदेश दिले होते.

(३) उक्त चौकशीअंती रास्तभाव दुकानदार दोषी आढळून आला आहे. तसेच तहसिल कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी जबाबदार आढळून आले आहेत. संबंधित दुकानाचा परवाना रद्द करण्यात आला आहे व श्री.जे.डी.पाटील, क.लि. यांना निलंबित करण्यात आले आहे.

पात्र लाभार्थ्यांना ई-पॉसद्वारे धान्य वाटप करता येत नसल्यास ओळख पटवून manual पध्दतीने धान्य देण्याची परवानगी देण्यात आली आहे. शासनाचे असेही स्पष्ट आदेश आहेत की, पात्र शिधापत्रिकाधारकाला विना शिधा जिन्नस परत पाठविले जाणार नाही, याबाबत योग्य दक्षता घेण्यात यावी.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा (ता.जि.हिंगोली) विद्यापीठातील महाविद्यालयीन शिक्षकांच्या मागण्याबाबत**

**(३५) १३०१६८ (०४-१२-२०१८) श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ कॉलेज शिक्षक (ता.जि.हिंगोली) संघटनेने प्राध्यापकांच्या विविध मागण्यांसाठी काम बंद आंदोलनाचा इशारा कुलगुरु, स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा यांना माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान दिला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागण्यांची शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुसार प्राध्यापकांच्या मागण्या पूर्ण करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२४-०१-२०१९) :** (१) हे खरे नाही. तथापि, नमूद संघटनेच्या संत गाडगे महाराज महाविद्यालय लोहा, जि. नांदेड येथील कार्यालयाचा पत्ता असलेले दि.१८.१०.२०१८ चे निवेदन विद्यापीठास प्राप्त झाले असून सदर संघटनेच्या दि.११.१०.२०१८ च्या निवेदनानुसार धरणे आंदोलन स्थगित केल्याबाबत विद्यापीठास कळविले आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## देवरी (जि.गोंदिया) तालुक्यात शालेय पोषण आहार योजनेतंर्गत स्वयंपाकी व मदतनीसाच्या मानधनात वाढ करण्याबाबत

**(३६) १३०३९६ (०४-१२-२०१८) श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवरी (जि.गोंदिया) या तालुक्यात शालेय पोषण आहार योजनेतंर्गत स्वयंपाकी व मदतनीसाचे मानधनात वाढ करुन रूपये ६००० हजार करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १९ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा. महिला व बाल विकास मंत्री यांच्याकडे लेखी पत्रान्वये केली आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास मागणीच्या अनुषंगाने याबाबत निर्णय घेण्यात आला आहे काय व त्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-१२-२०१८) :** (१) गोंदिया जिल्हयातील अति दुर्गम नक्षलग्रस्त क्षेत्रातील शालेय पोषण आहार योजनेंतर्गत कार्यरत स्वयंपाकी तथा मदतनीस यांचे मानधन वाढविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिंनी दिनांक १७ ऑक्टोबर, २०१८ रोजी निवेदन दिले आहे.

(२) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत कार्यरत स्वयंपाकी तथा मदतनीस यांच्या मानधनात वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव विचारधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोवाचीटोला जांभळी (ता.सालेकसा, जि.गोंदिया) येथील जिल्हा परिषद हेटीटोला येथील शाळा पुर्ववत सुरू करण्याबाबत**

**(३७) १३०४५७ (०५-१२-२०१८). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोवाचीटोला, जांभळी (ता.सालेकसा, जि.गोंदिया) येथील हेटीटोला जिल्हा परिषद शाळा दिनांक ३० नोव्हेंबर, २०११ च्या शासनाच्या निकषानुसार नियमात बसत असूनही बंद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बंद शाळा पुर्ववत सुरू करण्याची मागणी मा.शालेय शिक्षण मंत्री, शिक्षणधिकारी जिल्हा परिषद (गोंदिया) प्राथमिक यांच्याकडे दिनांक ६ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त निवेदनाच्या मागणीच्या अनुषंगाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२२-०१-२०१९) :**(१) कमी गुणवत्तेमुळे पटसंख्या कमी होत असलेल्या शाळेचे जवळच्या चांगल्या गुणवत्तेच्या शाळेत समायोजन करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून त्यामध्ये या शाळेचा समावेश आहे .

(२) सदर शाळा मूळ ठिकाणी सुरु ठेवण्याबाबत लेखी निवेदनाद्वारे विनंती केली आहे.

(३) याबाबत क्षेत्रीय स्तरावर तपासणी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भोर (जि.पुणे) तालुक्यातील डोंगरी व दुर्गम भागात स्वस्त धान्य मिळत नसल्याबाबत**

**(३८) १३०९०४ (२९-१२-२०१८). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोर (जि.पुणे) तालुक्यातील डोंगरी, दुर्गम भागात स्वस्त धान्य दुकानातून धान्य न मिळणे, मालाची पावती न मिळणे तसेच धान्याचे व रॉकेलचे दर फलक न लावणे अशा तक्रारी तहसिलदार व प्रांताधिकारी यांच्याकडे करण्यात येऊनही दुकानदारांवर कारवाई होत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार गैरप्रकार करणा-या स्वस्त धान्य दुकानदारांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०६-०२-२०१९) :** (१) तक्रारी प्राप्त झाल्यानंतर चौकशी करुन कारवाई करण्यात आलेली आहे.

(२) स्वस्त धान्य दुकानदारांच्या खालील बाबी आढळून आल्या:-

I. शिधापत्रिकाधारकांना मालाची पावती दिली नाही.

II. लाभार्थ्यांनकडून जास्त दराने पैसे घेणे.

III. लाभार्थ्यांना दर सांगत नाहीत.

IV. शिधापत्रिकेवर तसेच स्टॉक रजिस्टरला मालाची नोंद न घेणे.

त्यानुसार दुकानदारावर केलेले कार्यवाही खालीलप्रमाणे:-

I. एका दुकानदाराचे १००% अनामत रक्कम जप्त करुन शासन जमा केले.

II. दोन दुकानदारावर नोटीस बजावण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कसबा तारळे, फेजिवडे (ता. राधानगरी, जि.कोल्हापूर ) अनफ खुर्द, अनफ बु (ता.भुदरगड) व आजरा नगरपंचायत हद्दीमध्ये अल्पसंख्याक विकास निधीमधून निधी मिळणेबाबत**

**(३९) १३११८२ (०४-१२-२०१८) श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कसबा तारळे, फेजिवडे (ता.राधानगरी, जि.कोल्हापूर) अनफ खुर्द, अनफ बु (ता.भुदरगड) व आजरा नगरपंचायत हद्दीमध्ये अल्पसंख्याक विकास निधीमधून सदर गावांकरिता निधी मिळणेबाबतची मागणी मा.अल्पसंख्याक मंत्री यांच्याकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी लेखी निवेदनाद्वारे दिनांक ५ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, व त्यानुसार अल्पसंख्याक विकास निधीमधून सदर गावांना निधी देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच त्याची सद्यस्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२४-०१-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर निवेदनातील मागण्या विचाराधीन असुन निधीच्या उपलब्धतेनुसार उचीत कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्द्भवत नाही.

---

**मुंबईतील भायखळा येथील जमीन उर्दू भवन निर्मितीसाठी देण्याबाबत**

**(४०) १३१३६४ (०४-१२-२०१८). ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील भायखळा येथील भूकर क्र. १९०८, क्षेत्रफळ १७०३.१९ चौ.मी. जागा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, लोअर परेल करिता आरक्षित असून उक्त जागा गत १० वर्षांपासून विनावापर पडून असल्याने सदर जागा उर्दू भवन बांधण्यासाठी आरक्षित/संपादित करणेची लेखी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.अल्पसंख्याक विकास मंत्री, प्रधान सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग यांच्याकडे माहे मे व ऑगस्ट २०१८ च्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत अल्पसंख्याक विभागामार्फत शासनाकडे कॅबिनेट बैठकीत रितसर प्रस्ताव सादर करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, सदर उर्दू भवनच्या निर्मितीच्या अनुषंगाने संबंधित विभागात समन्वय होण्यासाठी वरीष्ठ अधिकाऱ्यांची सयुंक्त बैठक आयोजित करण्यात आली अथवा भविष्यात आयोजित करणार आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (१७-०१-२०१९) :** (१) होय.

(२) व (३) सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जव्हार महाविद्यालय (जि.पालघर) येथे मुक्त विद्यापीठाचे अभ्यासकेंद्र सुरु करण्याबाबत

**(४१) १३१५९९ (०४-१२-२०१८) श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोखले एज्युकेशन सोसायटी नाशिक (जि.पालघर) अंतर्गत असलेल्या जव्हार महाविद्यालयातील मुक्त विद्यापीठाचे अभ्यास केंद्र बंद केल्याने अनेक विद्यार्थ्यांची शैक्षणिक गैरसोय होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार आदिवासी भागातील उक्त जव्हार महाविद्यालयातील मुक्त विद्यापीठाचे अभ्यास केंद्र सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (२३-०१-२०१९) :** (१) हे खरे आहे.

जव्हार महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी गोखले एज्युकेशन सोसायटीच्या आदेशानुसार शैक्षणिक सत्र २०१८-१९ पासून महाविद्यालयात सुरु असलेले मुक्त विद्यापीठाचे पूर्वतयारी बी.ए.बी.कॉम. हे सर्व शिक्षणक्रम बंद करण्याचा निर्णय घेतल्याचे कळविले असून त्यानुसार जव्हार महाविद्यालयातील मुक्त विद्यापीठाचे अभ्यास केंद्र शैक्षणिक सत्र २०१८-१९ पासून बंद केले आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

तथापि, सध्या या परिसरात खालील दोन अभ्यासकेंद्राचा पर्याय उपलब्ध आहेः-

१. मोहिते गुरुजी महाविद्यालय, मु.पो.खोडाळा, ता.मोखाडा, जि.पालघर

२. संजीवनी शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य महाविद्यालय, औंदे, विक्रमगड, ता.वाडा, जि.पालघर

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शाळांतील विद्यार्थ्यांना गणवेश देण्याबाबत**

**(४२) १३१९१७ (०४-१२-२०१८). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक शाळांतील विद्यार्थ्यांचा स्वातंत्र्यदिन गणवेशाविनाच साजरा करावा लागल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने गणवेश खरेदीतील गैरव्यवहाराच्या पार्श्वभूमीवर गतवर्षी विद्यार्थ्यांना गणेवश देण्याऐवजी त्याचा निधी विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा करण्याचा निर्णय घेतला मात्र वर्ष संपले तरीही अनेक विद्यार्थ्यांची बँक खातीच सुरु होऊ शकलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार यास जबाबदार असणा-यांविरुध्द तसेच विद्यार्थ्यांना तात्काळ गणवेशाचा पुरवठा होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे

**श्री. विनोद तावडे (२०-१२-२०१८) : (**१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न. उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, १९७७ कलम १६ च्या आदेशाच्या अंमलबजावणीबाबत**

**(४३) १३२३९५ (०५-१२-२०१८) डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, १९७७ कलम १६ नुसार (शेडयुल सी नोटीफिकेशन) दिनांक ६ सप्टेंबर, २०१६ रोजीच्या शासनाच्या आदेशाची अंमलबजावणीबाबतचे लेखी निवेदन महाराष्ट्र विनाअनुदानित शिक्षक-कर्मचारी संघर्ष समिती, औरंगाबाद यांनी माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान मा.शालेय शिक्षण मंत्री यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियमन १९७७ कलम १६ नुसार महाराष्ट्र शासन परिशिष्ठ क्र चे आदेश (नोटीफिकेशन) वेतन १०१४/सी.आर.२१४/१४/टीएनटी-३ दिनांक ६ सप्टेंबर, २०१६ हा आदेश विधीमंडळासमोर विचारार्थ सादर होणे बंधनकारक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-०१-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) होय
(३) सदर आदेश दिनांक ६ मार्च, २०१७ रोजी विधीमंडळाच्या पटलावर सादर करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## कोरपना व जिवती (जि.चंद्रपूर) तालुक्यातील अंत्योदय व इतर शिधापत्रिका धारकांना नियमित धान्य देण्याबाबत

**(४४) १३२६८४ (२९-१२-२०१८) ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरपना व जिवती (जि.चंद्रपूर) तालुक्यातील शासन निर्धारीत अंत्योदय व इतर शिधापत्रिका धारक कुटुंबांना नियमित धान्य देण्यात येत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास उक्त प्रकरणी तक्रारीच्या अनुषंगाने किती दुकानांची चौकशी करण्यात आली, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त प्रकरणात अधिक दराने धान्य विक्री करणाऱ्या स्वस्त धान्य दुकानदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०६-०२-२०१९) :** (१) नाही, कोरपना व जिवती (जि.चंद्रपूर) तालुक्यातील शासन निर्धारीत अंत्योदय व इतर शिधापत्रिका धारक कुटुंबांना नियमित धान्य देण्यात येते.
(२) कोरपना/जिवती तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानांविरुध्द प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने तपासणी करण्यात आली. तपासणीत खालील दोष आढळून आले:-

१) तक्रार नोंदवही ठेवलेली नाही.
२) अंत्योदय व प्राधान्य कुटुंबाची यादी प्रसिध्द केली नाही.
३) दैनिक साठा फलक लावलेला नाही.
४) पावती पुस्तक ठेवलेले नाही.
५) तराजू वजने प्रमाणित केले नाहीत.

६) साठा रजिस्टर व विक्री रजिस्टर अद्ययावत नाही.
७) शासन परिमाणानुसार वाटप नाही.
८) अन्नधान्याचे ऑनलाईन वाटप केले जात नाही.
वरील दोष विचारात घेऊन खालील कारवाई करण्यात आली:-

१) कोरपना तालुक्यात ८ रास्तभाव दुकानापैकी १ दुकान रद्द व १ दुकान निलंबित करण्यात आले. ६ दुकानदारांवर दंडात्मक कारवाई करून प्राधिकारपत्राची अनामत रक्कम शासन जमा करण्यात आली आहे.

२) जिवती तालुक्यात १५ रास्तभाव दुकानांपैकी १ दुकान निलंबित केले. १४ रास्तभाव दुकानदारांना सक्त ताकीद देण्यात आली.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर येथे अल्पसंख्याक कल्याण समितीची स्थापना करण्याबाबत**

**(४५) १३३०५७ (०४-१२-२०१८) कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हा प्रशासनाने गत चार वर्षापासून अल्पसंख्याक कल्याण समितीची स्थापना केली नसल्यामुळे अल्पसंख्याकच्या कल्याणासाठी केंद्र सरकारने जाहिर केलेला १५ कलमी कार्यक्रम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(२) तसेच, गत साडेचार वर्षापासून येथील ऊर्दु घराचे काम देखील प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळामध्ये ३५ जिल्हयात केवळ ४६ जण नाममात्र वेतनावर कंत्राटी पध्दतीवर कार्यरत असून त्यांची शासन सेवेत सामावून घेण्याची मागणी आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रश्न १ व २ नुसार यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सदर समितीची स्थापना करणे तसेच प्रलंबित असलेल्या उर्दु घराचे काम पुर्ण करुन कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासनसेवेत सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-०१-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

(३) एकूण ५१ कर्मचारी कार्यरत असून त्यांची शासन सेवेत समावून घेण्याची मागणी आहे.

(४) शासन निर्णय, दिनांक १५.०४.२०१७ अन्वये जिल्हास्तरीय अल्पसंख्याक कल्याण समितीची पुनर्रचना केली असून जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दर तिमाही आढावा बैठक आयोजित करण्यात येते. सदर समितीमध्ये नामवंत अशासकीय स्वयंसेवी संस्थांचे एका प्रतिनिधीची नियुक्ती करण्यात आली आहे.

सोलापूर शहरात उर्दू घर बांधकामाच्या सुधारित आराखडयास उच्चस्तरीय सचिव समितीच्या दिनांक २१.०३.२०१७ च्या बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. उर्दू घर बांधण्याकरीता रु.८,९७,१९,०००/- किंमतीच्या अंदाजपत्रकास मान्यता मिळालेली आहे. टेंडर प्रक्रियेसाठी वर्ष २०१८-१९ साठी दिनांक १७.१०.२०१८ च्या शासन निर्णयान्वये रु.१ कोटी इतके अनुदान वितरीत करण्यात आले आहे. त्यानुसार टेंडर प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाच्या कंत्राटी पध्दतीवर कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना शासन सेवेत सामावून घेण्याबाबतचे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मनमाड व नांदगांव (जि.नाशिक) नगर परिषद अंतर्गत मुस्लीम कब्रस्तानाच्या विकास कामांना निधी देण्याबाबत

**(४६) १३३१८१ (०४-१२-२०१८) श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनमाड व नांदगांव (जि.नाशिक) नगर परिषदे अंतर्गत मुस्लीम कब्रस्तानाच्या विकास कामांना निधी उपलब्ध करून देणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १६ जुलै, २०१८ रोजी मा.अल्पसंख्यांक विकास मंत्री व दिनांक १८ जुलै, २०१८ रोजी मा.राज्यमंत्री, अल्पसंख्यांक विकास यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे हे, खरे आहे काय,

(२) असल्यास याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-०१-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर निवेदनातील मागणी विचाराधीन असुन निधीच्या उपलब्धतेनुसार उचीत कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील बंद शाळांना शिक्षण विभागाने अ दर्जा दिल्याबाबत

**(४७) १३३२०२ (०५-१२-२०१८). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या प्राथमिक शिक्षण विभागाने दिनांक २३ नोव्हेंबर २०१७ रोजी एक तातडीचे पत्र काढत शाळामध्ये गुणवत्ता नाही तसेच शाळांची पटसंख्या कमी आहे असे म्हणून राज्यातील १३१४ शाळा बंद करून त्या समायोजित करण्यात आल्या असतांना सुध्दा त्याच शाळांना महिन्याभराने शिक्षण विभागाव्दारे कोटयवधी रूपये खर्च करुन वृत्तपत्रिय जाहिरातींत तुम्हाला अ दर्जा मिळाल्याचे जाहिर अभिनंदन केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळा बंद करण्यासाठी दिलेली कारणे खोटी की "अ" दर्जा म्हणून दिलेली कारणे खोटी आहेत असा संभ्रम निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीअंती संबधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. विनोद तावडे (२२-०१-२०१९) :** (१) राज्यातील प्रत्येक शाळेने स्वयं मुल्यमापनाची माहिती शाळास्तरावर भरलेली आहे. त्या माहितीच्या आधारे शाळांना अ,ब,क अशा ग्रेड देण्यात आल्या आहेत. २० पेक्षा कमी पट असलेल्या शाळांनी देखील स्वयंमूल्यमापनाची माहिती भरलेली आहे. त्यामुळे अशा शाळांपैकी काही शाळा स्वयंमूल्यमापनात अ श्रेणी असण्याची शक्यता आहे. तथापि बाहय मूल्यमापन झाल्यानंतरच श्रेणी अंतिम ठरणार आहे.
(२) नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्हयातील अल्पसंख्याक विकास विभागातर्फे राबविण्यात येणा-या योजनेबाबत**

**(४८) १३३४९८ (०४-१२-२०१८). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्हयातील धार्मिक अल्पसंख्याक बहुल शासनमान्य खासगी शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नगरपालिका शाळा व अपंग शाळा यांना दुरुस्तीसह पायाभूत सोयी सुविधा पुरविण्यासाठी शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभागातर्फे राबविण्यात येणा-या योजनेचा जिल्हयातून एकही प्रस्ताव दाखल करण्यात आला नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कल्याणकारी योजनेची समाजातील अनेक गरजू व्यक्तीला माहिती मिळत नसल्याने सदर योजनांपासून त्यांना वंचित राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू योजनेचे प्रस्ताव दाखल न करण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार यास जबाबदार असणा-याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२१-०१-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील सर्व अनुदानित शाळांमध्ये विद्यार्थ्यांना पोषण आहार बनविण्याकरिता गॅस कनेक्शन देण्याबाबत

**(४९) १३४३१२ (०५-१२-२०१८) श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.मोहन फड (पाथरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदपूर (जि.लातूर) तालुक्यातील अनुदानित शाळांमधून विद्यार्थ्यांना पोषण आहार देण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने शाळेच्या परिसरात पोषण आहाराचे अन्न शिजविण्यात येऊ नये असा नियम केला असला तरीही अहमदपूर तालुक्यातील ८५ टक्के शाळांमध्ये रोज चुलीवर खिचडी शिजविण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चुलीच्या धुरामुळे विद्यार्थ्यांच्या डोळ्यांना त्रास होऊन श्वसनाचे तसेच अन्य आजार होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सर्व शाळांना तातडीने गॅस कनेक्शन देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-१२-२०१८) : (**१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) अहमदपूर तालुक्यातील शालेय पोषण आहार योजनेंतर्गत पात्र २६६ शाळा पैकी १३९ शाळांमध्ये गॅस कनेक्शन उपलब्ध आहे. उर्वरित शाळांमध्ये लोकसहभागातून गॅस कनेक्शन उपलब्ध करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांना वेळेवर वेतन देण्याबाबत

**(५०) १३४३३३ (०५-१२-२०१८) श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हा परिषद अंतर्गत प्राथमिक शिक्षकांची मासिक वेतन देयके खाजगी संस्थाकडून तयार करण्यात येऊनही शिक्षकांना वेळेवर वेतनाची रक्कम मिळत नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षकांना वेतनाची रक्कम वेळेवर न मिळण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार यास जबाबदार असणा-या संबंधित गट शिक्षणअधिकारी/जिल्हा शिक्षणाधिकारी यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-०१-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **श्री. जितेंद्र भोळे**
**मुंबई.** **सचिव, (कार्यभार)**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.